सकाळ

# 'एसएसव्हीपीएस'च्या विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

धुळे, ता. १९ : क्वीक हिल फाउंडेशनतर्फे श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या चार विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानांतर्गत क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये साक्षी देवरे हिची क्लब प्रेसिडेंट म्हणून, प्रशांत भदाणे याची क्लब सेक्रेटरी, अजय खैरनार याची कम्युनिटी डायरेक्टर व श्रेया विसपुते हिची पीआर डायरेक्टर म्हणून निवड झाली. तसेच या अभियानाच्या समन्वयक म्हणून प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांची निवड झाली. सायबर सुरक्षा अभियान राबवण्यासाठीचे प्रशिक्षण क्विक हिल फाउंडेशनच्या पुणे येथील कार्यालयात नुकतेच झाले. या प्रशिक्षणादरम्यान सीनियर मॅनेजर अजय शिर्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्विक हिल फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्युटिव्ह सुगंधा दाणी व गायत्री पवार यांनी अभियानाची रूपरेषा सांगितली. तसेच विद्यार्थ्यांकडून ॲक्टिव्हिटीज करून घेतल्या. फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनीही विद्यार्थी, शिक्षकांशी संवाद साधला. निवड झालेले विद्यार्थी पुढील काही महिन्यांसाठी या अभियानांतर्गत धुळे जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये तसेच जनमानसात सायबर फ्रॉडबद्दल जागरूकता निर्माण करून डिजिटल वर्ल्डमध्ये आपण कसे सुरक्षित राहू शकतो, याबद्दल जनजागृती करतील. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार कुणाल पाटील, उपाध्यक्ष एस. टी. पाटील, प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे, विभागप्रमुख प्रा. राकेश देवरे आदींनी अभिनंदन केले.



**पुणे :** क्वीक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांच्यासह क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झालेल्या साक्षी देवरे, श्रेया विसपुते, अजय खैरनार, प्रशांत भदाणे आदी.